


सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २४३ • गुरुवार दि.२५ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

# खा.संजय दिना पाटलांची पत्रकारांना जीवे मारण्याची धमकी

## राजकीय,पत्रकारीता क्षेत्रात खळबळ;शिंदेंकडून सावरासावर



मुंबई/प्रतिनिधी-शिवसेना (ठाकरे गट) सोडून शिंदे गटात प्रवेश केलेले ईशान्य मुंबईचे खासदार संजय दीना पाटील यांच्या एका वक्तव्यामुळे राजकीय वातावरण तापले आहे. पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांवर संतप्त प्रतिक्रिया देताना त्यांनी अर्वाच्च भाषेचा वापर करीत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार आज घडला आहे. या प्रकरणामुळे राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी यापूर्वीच मुंबई पोलिस आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे. राऊत यांनी आपल्या तक्रारीत संजय दीना पाटील यांनी केलेल्या काही वक्तव्यांचा उल्लेख करत गंभीर आरोप केले आहेत. आंदोलन करणाऱ्यांवर बॉम्ब टाकण्याची आणि विरोधकांना घरात घुसून मारण्याची भाषा वापरल्याचा आरोप त्यांनी केला असून हा राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित गंभीर विषय असल्याचेही नमूद केले आहे.या आरोपांबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारल्यानंतर संजय दीना पाटील यांनी प्रतिक्रिया देताना, मी जे बोललो ते कॅमेऱ्यासमोर बोललो आहे. पोलिसांनी चौकशीसाठी बोलावले तर मी नक्की जाईन. जे बोललो आहे त्याबाबत उत्तर देण्यास तयार आहे, असे सांगितले. तसेच, जे करणार ते भोगणार, असेही ते म्हणाले.मात्र त्यानंतर पत्रकारांनी सातत्याने प्रश्न विचारताच पाटील यांचा संताप अनावर झाल्याचे दिसून आले. त्यांनी पत्रकारांना उद्देशून, इज्जत करतोय, इज्जत करा. उगीच डोक्यात जाऊ नका. जे लिहायचं ते लिहा, रेकॉर्ड करा. पुन्हा आलात तर मारून पाठवणार, अशा शब्दांत इशारा दिला. या वक्तव्यादरम्यान त्यांनी अर्वाच्च भाषेचाही वापर केल्याचे समोर आले आहे. खासदाराच्या या वक्तव्यानंतर विरोधकांनी तीव्र आक्षेप घेतला असून लोकप्रतिनिधीकडून अशा प्रकारची भाषा वापरणे आणि पत्रकारांना धमकावणे लोकशाहीसाठी घातक असल्याची टीका करण्यात येत आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होणार का आणि पोलिस प्रशासन कोणती भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### उपमुख्यमंत्री शिंदेंकडून सावरासावर

खा.संजय दिना पाटील यांनी पत्रकारांबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यानंतर निर्माण झालेल्या वादावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया देत त्यांची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. संजय दिना पाटील यांची माझ्याशी चर्चा झाली असून पत्रकारांबाबत चुकीचे वक्तव्य करण्याची त्यांची कोणतीही इच्छा नव्हती, तसेच पत्रकारांच्या भावना दुखावण्याचा हेतूही नव्हता, असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

शिंदे म्हणाले की, संजय दिना पाटील यांनी आपले आणि पत्रकारांचे संबंध नेहमीच चांगले राहिल्याचे सांगितले आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून त्यांच्याविरोधात आणि त्यांच्या कुटुंबाविरोधात अत्यंत खालच्या पातळीवरची भाषा वापरली जात असल्यामुळे त्यांच्या मनात संताप निर्माण झाला आहे. तो संताप पत्रकारांविरोधात नसून सातत्याने अपशब्द वापरणाऱ्यांविरोधात आहे, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी शिंदे यांनी राजकीय टीकेच्या नावाखाली वापरल्या जाणाऱ्या आक्षेपार्ह भाषेवरही निशाणा साधला. तोडून टाका, मारून टाका, घरात घुसा अशा प्रकारची भाषा सातत्याने वापरली जात असून हा केवळ व्यक्तीचा नव्हे, तर माध्यमांचाही अपमान असल्याचे त्यांनी सांगितले. २०२२ पासून सुरू असलेल्या अशा वक्तव्यांमुळे महाराष्ट्राची राजकीय संस्कृती रसातळाला गेली असून आई-बहिणींविषयी वापरली जाणारी भाषा अत्यंत निंदनीय असल्याचेही त्यांनी म्हटले.दरम्यान, लोकप्रतिनिधींनी पत्रकारांबाबत कोणतेही अपमानास्पद वक्तव्य करू नये, अशी स्पष्ट भूमिका मांडत शिंदे म्हणाले की, संजय दिना पाटील यांना आपण सांगितले आहे की, त्यांच्या बोलण्यातून पत्रकारांचा अपमान झाला असेल, तर त्यांनी सार्वजनिकरित्या दिलगिरी व्यक्त करावी. त्यामुळे हा वाद अधिक वाढणार नाही आणि पत्रकारांबद्दलचा आदर कायम राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# नसरापूर लैंगिक अत्याचार प्रकरणात आरोपी दोषी

## शिक्षेवर २९ जूनला अंतिम शिक्कामोर्तब

पुणे:नसरापूर येथील अल्पवयीन चिमुरडीवरील लैंगिक अत्याचार व हत्येप्रकरणी आरोपी भीमराव कांबळे याला पुणे जिल्हा व सत्र न्यायालयाने गुरुवारी दोषी ठरवले. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी निकाल देताना आरोपीला २९ जून रोजी शिक्षा सुनावण्यात येईल, असे स्पष्ट केले. त्यामुळे या अमानुष गुन्ह्यात दोषी ठरलेल्या आरोपीला फाशी, जन्मठेप की आजन्म कारावासाची शिक्षा होणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

निकालापूर्वी न्यायालयाने सरकार पक्ष आणि बचाव पक्षाला अंतिम युक्तिवादाची संधी दिली. यावेळी आरोपीने पुन्हा एकदा आपण निर्दोष असल्याचा दावा करण्याचा प्रयत्न केला. मात्र, न्यायालयाने त्याला दोषी ठरवत शिक्षेचा निर्णय २९ जूनपर्यंत राखून ठेवला.भोर तालुक्यातील नसरापूर येथे १ मे २०२६ रोजी साडेतीन वर्षांची चिमुरडी बेपत्ता झाली होती. काही वेळाने तिचा मृतदेह आढळून आला. वैद्यकीय तपासणीत तिच्यावर लैंगिक अत्याचार करून हत्या करण्यात आल्याचे निष्पन्न झाल्यानंतर राज्यभर संतापाची लाट उसळली होती. विशेष न्यायालयातही खटल्याची सुनावणी जलदगतीने पार पडली.सरकार पक्षाने भक्कम पुरावे आणि साक्षीदारांच्या आधारे आरोपीविरोधातील आरोप सिद्ध केले. या प्रकरणातील विविध कलमांअंतर्गत आरोपी दोषी ठरला आहे. यावेळी नसरापूर ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने न्यायालयाबाहेर उपस्थिती लावली होती. २९ जून रोजी होणाऱ्या शिक्षेच्या घोषणेकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसाठी किसान मजदूर सभेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

नांदेड/प्रतिनिधी-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाचक अटी व शर्तीसह जाहीर केलेल्या कर्जमाफीमुळे केवळ दहा टक्के शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. त्यामुळे विना अटीशर्ती सरसकट संपूर्ण कर्जमाफी करण्यात यावी यासह गायरान शासकीय जमिनी कास्तकारांच्या नावे करण्याच्या मागणीसाठी अखिल भारतीय किसान मजदूर सभेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज (गुरुवार) दि.२५ जून रोजी निदर्शने आंदोलन करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच शेतकरी कर्जमाफी जाहीर केली आहे. सदर शेतकरी कर्जमाफी योजना ही फसवी असून जाचक अटी शर्तीमुळे केवळ दहा टक्के शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे ही योजना जगाचा पोशिंद्याच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार असून खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना दिलासा देण्याकरिता विनाअटी व शर्ती संपूर्ण शेतकरी कर्जमाफी करावी तसेच पडीक शासकीय जमीन -जंगल व गायरान पट्टे कास्तकारांच्या नावे करण्यात यावेत व प्रत्येक भूमहीन



कुटुंबाला किमान पाच एकर जमीन द्यावी या मागणीसाठी अखिल भारतीय किसान मजदूर सभेच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात अखिल भारतीय किसान मजदूर सभेचे केंद्रीय सचिव कॉ. अशोक घायाळे महाराष्ट्र अध्यक्ष पी.डी वासमवार सचिव मानेजी पाटील चोळाखेकर, नेमीचंद राठोड, भानुदास आडे, प्रकाश राठोड, गुलाब पवार, कपिल राठोड, चांदू झुंजारे,सतीश जाधव, संदीप जाधव, नितीन इबितवार यांच्यासह शेतकरी शेतमजूर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# विद्यापीठ पेपरफुटी प्रकरणाची सीआयडी चौकशी-ना.चंद्रकांत पाटील

## विधान परिषदेत सरकारचे आश्वासन

मुंबई/प्रतिनिधी-मुंबई विद्यापीठाच्या टीवायबीकॉम परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी व्हावी, यासाठी विद्यापीठाच्या कुलगुरूंना सीआयडी चौकशीबाबत सूचना करण्यात येतील, असे आश्वासन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी विधान परिषदेत दिले. या प्रकरणात केवळ विद्यार्थी नव्हे, तर संघटित रॅकेट आणि परीक्षा व्यवस्थापनाशी संबंधित काही व्यक्तींचाही सहभाग असण्याची शक्यता असल्याचा आरोप काँग्रेसचे आमदार भाई जगताप यांनी केला.

एप्रिल २०२६ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या टीवायबीकॉम परीक्षेतील डायरेक्ट अँड इनडायरेक्ट टॅक्सेस, इकॉनॉमिक्स ऑफ कॉमर्स आणि कॉस्ट अकाउंटिंग/कॉमर्स या तीन विषयांच्या प्रश्नपत्रिका परीक्षा सुरू होण्यापूर्वीच सोशल मीडियावर व्हायरल झाल्या होत्या. या प्रकरणी विद्यापीठातील कँत्राटी शिपाई सुदेश तुकाराम इंदप याच्याविरुद्ध बीकेसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.प्रश्नोत्तराच्या तासात भाई जगताप यांनी हा मुद्दा उपस्थित करत, विद्यार्थ्यांचे मोबाईल जप्त करण्यात आले असले तरी सुरुवातीला पोलिसांत तातडीने गुन्हा दाखल करण्यात आला नाही, अशी टीका केली. पेपरफुटीमागे संघटित रॅकेट कार्यरत असण्याची शक्यता असल्याने संपूर्ण प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली.यावर उत्तर देताना मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित हा अत्यंत गंभीर विषय आहे. विद्यापीठ कायद्यानुसार सरकार थेट सीआयडी चौकशी जाहीर करू शकत नाही. मात्र, कुलगुरूंना त्याबाबत आवश्यक सूचना दिल्या जातील. तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी परीक्षा पान ४ वर

# पाच जणांच्या हत्येच्या कथित दाव्याची चौकशी करा-खा.संजय राऊत

मुंबई/प्रतिनिधी-नुकतेच शिंदे गटात सामील झालेले खा.संजय दिना पाटील यांनी आंदोलकांना धमकावत मी पाच जणांना ठार केले आहे आणि घरात घुसून बॉम्ब टाकेन अशा स्वरूपाची विधाने केल्याचा आरोप प्रकरणाची तातडीने फौजदारी चौकशी करावी अशी मागणी शिवसेनेचे खा.संजय राऊत यांनी मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खा.संजय राऊत यांनी ईशान्य मुंबईचे खा.संजय पाटील यांच्या कथित वादग्रस्त वक्तव्यांची दखल घेत मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांना सविस्तर पत्र पाठवले आहे राऊत यांनी पत्रात म्हटले आहे की, राज्यातील सध्याच्या राजकीय वातावरणात विविध ठिकाणी सुरू असलेल्या



आंदोलनांबाबत खासदार संजय पाटील यांनी आंदोलकांना उघडपणे जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. माझ्याविरोधात आंदोलन करण्यापूर्वी जिवाचा विमा काढा. अन्यथा स्मशानात किंवा रुग्णालयात पाठवीन, असे कथित वक्तव्य त्यांनी केल्याचा उल्लेख पत्रात करण्यात आला आहे. याचबरोबर, मी यापूर्वी पाच जणांना ठार केले आहे, या कथित विधानाचा संदर्भ देत राऊत यांनी पोलिसांनी त्या पाच व्यक्ती कोण होत्या, त्यांचा मृत्यू कशा परिस्थितीत झाला आणि पान ४ वर

# माहूरमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेतील दोन कोटी रुपयांच्या कथित अपहार प्रकरणी गुन्हा

माहूर/प्रतिनिधी-प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांसाठी वितरित करण्यात आलेला निधी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याऐवजी इतर खात्यांवर अनियमितपणे वर्ग केल्याप्रकरणी माहूर नगरपंचायतीचे तत्कालीन मुख्याधिकारी व इतर संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांविरोधात माहूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत २०१८ ते २०२१ या कालावधीत डीपीआर क्रमांक १ ते ४ मधील सुमारे ९३२ लाभार्थ्यांच्या घरकुलांसाठी मंजूर करण्यात आलेला सुमारे २ कोटी ७ लाख १ हजार ७२४ रुपयांचा निधी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा न करता इतर खात्यांवर वळविण्यात आल्याची तक्रार करण्यात आली होती. या तक्रारीची म्हाडाच्या दक्षता विभागामार्फत चौकशी करण्यात आली. चौकशीत अनियमिततेचा ठपका ठेवत फौजदारी कारवाई करण्यात आली असल्याचे समजते. प्रधानमंत्री आवास योजनेचे डीपीआर तयार करणे व लाभार्थ्यांची कागदपत्रे संकलित करण्यासाठी एका खासगी एजन्सीची ऑनलाइन निविदा प्रक्रियेद्वारे नियुक्ती करण्यात आली होती. या एजन्सीकडे नांदेड जिल्ह्यातील किनवट, भोकर, अर्धापूरसह एकूण १६ नगरपरिषद व नगरपंचायतींची कामे होती. माहूर नगरपंचायतीतही याच एजन्सीची नियुक्ती करण्यात आली होती. विशेष म्हणजे, राज्यातील तब्बल ९७ नगरपालिकांमध्ये या कंपनीमार्फत अशाच स्वरूपाची कामे करण्यात आली असल्याची माहिती समोर येत आहे.या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहे. जर नांदेड जिल्ह्यातील इतर १५ नगरपरिषद व नगरपंचायतींमध्ये तसेच राज्यातील ९७ नगरपालिकांमध्ये याच एजन्सीद्वारे कामे करण्यात आली असतील, तर त्या ठिकाणच्या व्यवहारांचीही चौकशी होणार का? की कारवाई केवळ माहूर पुरतीच मर्यादित राहणार? असा सवाल आता नागरिक, राजकीय वर्तुळ आणि प्रशासकीय स्तरावर चर्चिला जात आहे. म्हाडा, मुंबई येथील दक्षता व सुरक्षा विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश विष्णू चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दि. २४ जून रोजी रात्री १०.३६ वाजता भारतीय दंड संहितेच्या कलम ४०९, ४२० व ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांच्या आदेशानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

# पावसाचा नांदेड जिल्ह्याला पाच दिवसांचा यलो अलर्ट

नांदेड/प्रतिनिधी-जून महिना अर्ध्याहून अधिक कोरडा गेल्यानंतर प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी नांदेड जिल्ह्यासाठी २५ ते २९ जून २०२६ या कालावधीत यलो अलर्ट जारी केला असून, या पाच दिवसांत जिल्ह्यात वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. संभाव्य नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या असून नागरिकांनीही आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्राने गुरुवारी (२५ जून) दुपारी जारी केलेल्या अंदाजानुसार, २५ जून रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वादळी वारे, विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाट आणि मुसळधार पावसाची शक्यता आहे.तसेच २६ ते २९ जून या चार दिवसांत जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. संभाव्य प्रतिकूल हवामानामुळे शेतकरी, नागरिक तसेच विविध शासकीय यंत्रणांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. विशेषतः वादळी वारे व विजांच्या कडकडाटाच्या वेळी झाडाखाली अथवा उघड्या मैदानात थांबू नये, अनावश्यक प्रवास टाळावा, सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा आणि विद्युत उपकरणांचा वापर काळजीपूर्वक करावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पेपर फोडणारे ‘देशप्रेमी’ की,आवाज उठवणारे ‘देशद्रोही’?

**‘शिक्षण’ हा कोणत्याही देशाच्या भवितव्याचा पाया असतो, पण आज आपल्या देशात याच पायाला भ्रष्टाचाराची वाळवी लागली आहे की काय, अशी भीती वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. यावर्षी वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी ‘नीट’ परीक्षा दोन वेळा घ्यावी लागली, या एकाच घटनेवरून देशातील परीक्षा पद्धतीचा बोजवारा कसा उडाला आहे, हे स्पष्ट होते. मार्च महिन्यात झालेल्या पहिल्या परीक्षेचे पेपर लीक झाल्याचे विद्यार्थी आणि पालकांनी पुराव्यासह उघडकीस आणले. गेल्या वर्षीही नीट संदर्भात प्रचंड गोंधळ झाला होता, काही जणांना पोलिसांनी गजाआडही केले होते. परंतु, पुढे त्या तपासाचे काय झाले? हे ना देशाला ठाऊक आहे, ना कदाचित संबंधित मंत्र्यांना आठवत असेल. दरवर्षी चौकशीच्या नावाखाली केवळ धूळफेक केली जाते आणि मूळ सूत्रधार मात्र मोकाट फिरतात, हेच आजवरचे कटू सत्य आहे.या यंत्रणेच्या निष्काळजीपणाची आणि भ्रष्टाचाराची किंमत देशातील निष्पाप आणि गुणवंत विद्यार्थ्यांना आपल्या प्राणाने मोजावी लागत आहे. यावर्षी नीट पेपर लीक झाल्याच्या धक्क्यातून आणि मानसिक तणावातून अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. मीडियामध्ये १०-१२ विद्यार्थ्यांची नावे पुढे आली असली, तरी अशी कितीतरी नावे असतील ज्यांची कुठे साधी नोंदही झाली नसेल. परीक्षा पद्धतीतील या अक्षम्य घोडचुका म्हणजे केवळ तांत्रिक चुका नसून, तो या देशातील तरुण पिढीचा पद्धतशीरपणे केलेला मानसिक खून आहे.या संपूर्ण प्रकरणात संशयाची सुई थेट यंत्रणेच्या सर्वोच्च पातळीवर जाते. पेपर सेट करण्याची प्रक्रिया ही अत्यंत गोपनीय आणि गुंतागुंतीची असते. कोणी एक व्यक्ती पेपर सेट करत नाही; १०-१२ तज्ज्ञांकडून प्रश्नसंच तयार करून घेतले जातात, मॉडरेटर त्यातील चुका दुरुस्त करतात आणि ऐनवेळी कोणता पेपर वापरायचा, याचा अंतिम निर्णय ‘नॅशनल टेस्टिंग एजन्सी’ (एनटीए) म्हणजेच नीट कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा असतो. मग इतक्या कडक सुरक्षेत असलेला पेपर बाहेर येतोच कसा? या घोटाळ्यात केवळ काही प्राध्यापक आणि खाजगी कोचिंग क्लासेसच्या संचालकांना अटक करून आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या केवळ ‘बदल्या’ करून प्रशासनाने हात झटकले आहेत. हा या प्रकरणाचा सोक्षमोक्ष नाही, तर डोळ्यात धूळफेक आहे. अधिकारी केवळ बदल्या होऊन सुरक्षित राहतील, तर अटक झालेले काही दिवसांनी जामिनावर बाहेर येऊन कायद्याच्या पळवाटा शोधत निर्दोष सुटतील, अशी रास्त शंका आज प्रत्येक विद्यार्थी आणि पालकांच्या मनात आहे.याहूनही अधिक संतापजनक आणि दुर्दैवी बाब म्हणजे या गंभीर समस्येवर सत्ताधाऱ्यांकडून दिली जाणारी अधिकृत वक्तव्ये. देशाच्या सरन्यायाधीशांनी एका वेगळ्या संदर्भात आरटीआय कार्यकर्ते आणि सुशिक्षित बेरोजगारांविषयी वापरलेल्या एका विशिष्ट शब्दाचा निषेध करण्यासाठी देशात ‘कॉकरोच पार्टी’ आंदोलनाचे वादळ उठले. या सुशिक्षित तरुण आणि पालकांनी जेव्हा केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत देशव्यापी आंदोलन छेडले, तेव्हा केंद्रीय मंत्र्यांनी आंदोलनकर्त्यांना ‘देशद्रोही’ आणि व्यवस्थेविरुद्ध ‘बंड’ करणारे संबोधले.केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या या विधानाची अत्यंत गंभीर दखल घेण्याची वेळ आली आहे. जर हक्कासाठी, न्यायासाठी आणि पारदर्शकतेसाठी रस्त्यावर उतरणारे तरुण, विद्यार्थी आणि पालक ‘देशद्रोही’ असतील, तर मग पेपर फोडणारे, विद्यार्थ्यांचे भवितव्य विकणारे दलाल आणि त्यांना पाठीशी घालणारे नीटमधील उच्चपदस्थ अधिकारी हे काय ‘देशप्रेमी’ ठरतात? व्यवस्थेतील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणणाऱ्यांना देशद्रोहाचे प्रमाणपत्र देणे हा लोकशाहीचा आणि सजग नागरिकांचा घोर अपमान आहे.जेव्हा देशाची शिक्षण व्यवस्थाच भ्रष्टाचाराच्या गर्तेत अडकते आणि ती सुधारण्याऐवजी आवाज उठवणाऱ्यांची गळचेपी केली जाते, तेव्हा देशाचे भविष्य अंधकारमय होते. मंत्र्यांच्या या विधानाचा दुसरा अर्थ जर असा निघत असेल की पेपरफुटीविरुद्ध बोलणे म्हणजे देशद्रोह, तर मतदारांना आता गांभीर्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. आपल्या मुलांचे भविष्य सुरक्षित ठेवायचे असेल, तर केवळ परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनीच नाही, तर संपूर्ण समाजाने आणि देशातील मतदारांनी या अन्यायाविरुद्ध आणि अशा उद्दाम वक्तव्यांविरुद्ध जागृत होऊन प्रश्न विचारण्याची आणि मतदानाच्या माध्यमातून योग्य उत्तर देण्याची नितांत गरज आहे.**

# इराण युद्धातून जग बहुध्रुवीय होण्याचा मार्ग बळकट

**संजय पांडे**

गेल्या काही वर्षांत पश्चिम आशियातील भू-राजकीय समीकरणे झपाट्याने बदलली आहेत. अमेरिका व इस्त्राइल यांच्या संयुक्त लष्करी आक्रमणाचा सामना करताना इराण केवळ रणांगणात टिकलाच नाही, तर त्याने सामरिक वरचढही मिळवली. या विजयामागे इराणची स्वदेशी लष्करी क्षमता, जनतेची एकजूट आणि निर्णायक मुत्सद्देगिरी होतीच, परंतु त्याला एक भक्कम आधारस्तंभ लाभला होताचीन. १२ दिवसीय युद्ध आणि रमजान युद्ध यांसारख्या ताज्या संघर्षांमध्ये इराणी जनता व उद्योजकांनी दाखवलेले सामर्थ्य आणि चीनने दिलेली आर्थिक, तांत्रिक, राजनैतिक व मानवतावादी मदत यामुळे एक नवे शक्तिसंतुलन उदयास आले आहे. चीनने इराणला नेमकी कोणती मदत केली, उपलब्ध माहितीतून चीनने इराण भागात आपला प्रभाव कसा वाढवला आहे आणि या साऱ्यातून अमेरिकन वर्चस्वाचा काळ इतिहासजमा होत असताना दिसत आहे.

चीनने इराणला दिलेली मदत ही रणांगणापासून पुनर्बांधणीपर्यंत सर्वच पातळ्यांवर पसरलेली होती. सर्वप्रथम, चीनने इराणची आर्थिक जीवनरेखा तुटू दिली नाही. पाश्चात्त्य निर्बंधांमुळे अनेक देश इराणी तेल खरेदी करण्यास घाबरत असताना, चीन सातत्याने इराणचा सर्वांत मोठा तेल ग्राहक राहिला. चीन हा इराणी आणि रशियन तेलाचा सर्वांत मोठा खरेदीदार असून, पाइपलाइनद्वारे आणि सागरी मार्गाने होणाऱ्या या व्यापारामुळे इराणचे परकीय चलन स्रोत सुकले नाहीत आणि युद्धकाळातही अर्थव्यवस्था कोसळली नाही. त्याचबरोबर, युद्धविराम व करारासाठी चीनने अत्यंत सक्रिय राजनैतिक पाठिंबा दिला. पाकिस्तानच्या मध्यस्थीने अमेरिकेशी अप्रत्यक्ष वाटाघाटी सुरू असताना, चीनने सुरुवातीपासूनच इराणच्या राजनैतिक दृष्टिकोनाचे स्वागत केले. करार जाहीर झाल्यानंतर चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांनी इराणी समकक्ष अब्बास अरागची यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करताना इराण सरकार आणि जनतेच्या दडपशाहीविरुद्धच्या दृढतेचे आणि जबाबदार राजनैतिक दृष्टिकोनाचे कौतुक केले. त्यांनी करारातील सर्व तरतुदींच्या अचूक व पूर्ण अंमलबजावणीची आवश्यकता अधोरेखित करत चीन त्यासाठी सहकार्य करण्यास तयार असल्याचे जाहीर केले. राजनैतिक आघाडीवर चीनने रशियासह समन्वित भूमिका घेतली. चीन आणि रशिया या दोन्ही देशांनी इस्लामाबाद कराराचे स्वागत केले. रशियन परराष्ट्रमंत्री सर्गेई लावरोव्ह यांनी अमेरिका व इस्त्राइल यांनी कराराचे पालन करण्याच्या जबाबदारीवर भर दिला. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या पाठिंब्यासह आंतरराष्ट्रीय समुदायाने या कराराला पाठबळ द्यावे, यावर चीन-रशिया यांचा एकमत झाला. या राजनैतिक आघाडीमुळे इराणला एकाकी पाडण्याचे अमेरिकेचे प्रयत्न विफल ठरले.

युद्धानंतरच्या पुनर्बांधणीच्या काळातही चीनने इराण व लेबेनॉनच्या पाठीशी उभे राहण्याची घोषणा केली. चिनी परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी स्पष्ट केले की बीजिंग युद्धोत्तर पुनर्बांधणीला उच्च प्राधान्य देते आणि आर्थिक परिस्थिती व जनतेचे जीवनमान सुधारण्यासाठी लवकरच नवीन मानवतावादी मदत पाठवली जाईल. शिवाय, इस्लामाबाद करारांतर्गत ३०० अब्ज डॉलर्सचा पुनर्बांधणी निधी उभारण्यात येणार असून, यात चीनचीही महत्त्वाची भूमिका राहणार आहे. लष्करी-तांत्रिक आघाडीवरही चीनने मोठी मदत दिली. हवाई संरक्षण, ड्रोन तंत्रज्ञान, क्षेपणास्त्र प्रणाली आणि सायबर क्षमता यांमध्ये सखोल सहकार्यामुळे इराणने स्वदेशी क्षमता बळकट करत इस्त्राइलच्या लोह गुंबद यंत्रणेला प्रभावीपणे आव्हान दिले.

डिजिटल भविष्याची बांधणी करण्यासाठीही चीन इराणचा प्रमुख भागीदार आहे. नुकत्याच झालेल्या ब्रिक्स फ्यूचर नेटवर्क इनोव्हेशन फोरम २०२६ मध्ये इराणने विश्वासार्ह संगणन शक्ती नेटवर्क विकसित करण्यासाठी सहकार्य चौकट प्रस्तावित केली आणि या उपक्रमाचे नेतृत्व चीनच्या उद्योग व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने केले. कृत्रिम बुद्धिमत्ता, औद्योगिक इंटरनेट ऑफ थिंग्ज, स्मार्ट लॉजिस्टिक, आधुनिक वित्तीय तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत इराण आपली क्षमता वाढवत असून, चीन यात प्रमुख तांत्रिक भागीदार आहे.

चीनचा इराणमधील प्रभावविस्तार हा केवळ सरकारी राजनैतिक संबंधांपुरता मर्यादित न राहता अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान, वित्तीय पायाभूत सुविधा आणि डिजिटल भविष्यापर्यंत सर्व व्याप्ती व्यापून आहे. इस्लामाबाद करार जाहीर होताच, इराणने चीन, रशिया आणि ओमानसोबत उच्चस्तरीय राजनैतिक समन्वय साधला. परराष्ट्रमंत्री अरागची यांनी चीनच्या वांग यी यांना कराराच्या तपशीलांची माहिती देताना इराण-चीन संबंधांच्या धोरणात्मक स्वरूपावर भर दिला आणि वाटाघाटीदरम्यान चीनने दिलेल्या पाठिंब्याबद्दल आभार मानले. दोन्ही देशांनी ऊर्जा, व्यापार आणि गुंतवणूक यांमध्ये द्विपक्षीय सहकार्य वाढविण्याच्या संधींवर चर्चा केली. यातूनच संसद अध्यक्ष मोहम्मद बाघेर कालिबाफ यांची दूरदृष्टी स्पष्ट होते. ते स्वतः इराणचे चीन प्रकरणाचे विशेष प्रतिनिधी असून, त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की भविष्यात कोणताही प्रादेशिक गट उदयास आला, तर त्यात चीन आणि इराण हे दोन निश्चित आणि अपरिहार्य सदस्य असतील. त्यांच्या मते, चीन आपल्यासाठी अद्वितीय आहे. आपण चीनला विश्वास दिला पाहिजे की आपण केवळ ग्राहक नसून पूर्ण भागीदार आहोत. ही भूमिका चीनबरोबरचे संबंध सामान्य व्यापारापासून सर्वांगीण धोरणात्मक भागीदारीकडे नेण्याचा निर्धार दर्शवते.







याच पार्श्वभूमीवर इराण चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष गादीर घियाफेह यांनी अधोरेखित केले की चीन २०३५ आणि २०५० पर्यंत कोठे पोहोचणार आहे हे समजून घेऊन इराण-चीन विकास दस्तऐवज तयार केला पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ता, अत्याधुनिक तंत्रज्ञान, विद्युत वाहने या चीनच्या प्राथमिकता आहेत आणि त्याच धर्तीवर इराणने आपली औद्योगिक व व्यापार धोरणे आखावीत. यामुळे चीनला इराणी बाजारपेठ प्राधान्याची वाटेल आणि इराण चीनच्या मूल्यसाखळीत स्वतःला स्थान मिळवून देईल. या धोरणाला मूर्त रूप देण्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्रांमध्ये इराण-चीन सहकार्य विभाग स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. निर्यात वाढविण्यासाठी व गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी ही क्षेत्रे सुरक्षित व स्थिर वातावरण देतील. यासोबतच इराण-चीन संयुक्त गुंतवणूक निधीची उभारणी करण्याचे ठरले, ज्यातून चीनला दीर्घकालीन भांडवली सहभाग सुनिश्चित करता येईल.

याशिवाय, इराण चेंबरच्या संशोधन केंद्राचे प्रमुख इसा मन्सूरी यांनी लॉजिस्टिक टाऊन उभारून सीमाशुल्क, वाहतूक आणि आर्थिक देवाणघेवाण सुलभ करण्याचा प्रस्ताव मांडला. चिनी कँम्न्या तेथे स्थायिक झाल्यास स्थानिक पातळीवर आउटसोर्सिंग होईल आणि इराण चीनसाठी पूर्व आशियातील पुरवठा पूल बनेल. पेट्रोकेमिकल क्षेत्रात इराण-चीनसोबत तुर्की, पाकिस्तान किंवा कतारसारख्या तिसऱ्या देशाला सामील करून नेटवर्क उभारावे, जेणेकरून इराण व्यापारी-औद्योगिक केंद्र बनेल, असेही सुचवण्यात आले. पायाभूत सुविधांच्या आघाडीवर चाबहार बंदर आणि मकरान तेल शुद्धीकरण प्रकल्प हे दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहेत. खाण व खनिज आयोगाने ३७ प्रकल्प ओळखले, ज्यांपैकी चाबहार बंदराचा निर्यात केंद्र म्हणून विकास, दुर्मिळ खनिजांचा शोध, खोल खाण उत्खनन आणि २५,००० खाण यंत्रांचा पुरवठा हे चार प्रकल्प महत्त्वाचे आहेत.

चीनने चाबहारमध्ये गुंतवणूक केल्यास इराण पश्चिम आशिया व युरेशियाचे व्यापारी केंद्र बनेल. याशिवाय, मकरान किनारपट्टीवर चीनला तेल शुद्धीकरण प्रकल्प उभारू देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला, जिथे इराण क्रूड तेल देईल आणि चीन प्रक्रियायुक्त उत्पादनांची स्वतः वाहतूक करेल; यामुळे चीनला ऊर्जा सुरक्षेची हमी मिळेल आणि इराण कच्च्या मालाऐवजी मूल्यवर्धित उत्पादनांचा निर्यातदार होईल. तंत्रज्ञान हस्तांतरण व संस्थात्मक बांधणीकडेही तितकेच गांभीर्याने पाहिले जात आहे. उद्योग आयोगाने जोर दिला की, सरकारी धोरण स्थिर असेल, कायद्यांचा आदर असेल आणि शांतता राहील, तर देशांतर्गत गुंतवणूकदार भाग आयात करण्याऐवजी तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी तयार आहेत. चीनबरोबरचे संबंध आता केवळ वित्तपुरवठ्यापुरते मर्यादित न ठेवता धोरणात्मक पातळीवर नेण्यासाठी 'एकीकृत कमांड' उभारण्याची मागणी करण्यात आली, जेणेकरून समांतर संस्था निर्माण न होता केंद्रीकृत धोरणनिर्मिती होऊ शकेल. डिजिटल क्षेत्रात तर इराणने ब्रिक्सच्या व्यासपीठावर सक्रिय नेतृत्व दाखवले. ब्रिक्स फ्यूचर नेटवर्क इनोव्हेशन फोरममध्ये इराणने भविष्यातील डिजिटल पायाभूत सुविधा, विश्वासार्ह संगणन शक्ती नेटवर्क आणि सीमापार औद्योगिक सहकार्य यांसाठी प्रस्ताव मांडले आणि स्वतःला एक प्रादेशिक तंत्रज्ञान भागीदार म्हणून स्थापित करण्याचा प्रयत्न केला.

हे सहकार्य केवळ विचारांची देवाणघेवाण न राहता प्रत्यक्ष संयुक्त प्रकल्प, चाचणी व्यासपीठे आणि औद्योगिक अनुप्रयोगांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. या साऱ्याला कालिबाफ यांच्या निर्णायक विधानाने राजकीय बळ दिले. ते म्हणाले, आता आपण क्षेपणास्त्र दागणाऱ्या तरुणांच्या हातून मोर्चा आपल्या हाती घेऊन जनतेला आर्थिक दडपणातून बाहेर काढले पाहिजे आणि समृद्धी आणली पाहिजे. त्यांनी चीनबरोबरच्या आर्थिक सहकार्यासाठी वित्तीय यंत्रणा, लॉजिस्टिक, वाहतूक आणि पायाभूत सुविधांमध्ये मूलभूत सुधारणांची आवश्यकता अधोरेखित केली. आपण शिक्षणापासून ते बाजारपेठ आणि पुरवठा साखळीपर्यंत चीनबरोबर एका सामायिक परिसंस्थेत जोडले गेले पाहिजे, हे त्यांचे वाक्य सहकार्याची खोली दर्शवते. निर्बंधांना 'कागदाचा तुकडा' संबोधणारे व्यवस्थापक नसल्याचे सांगून ते पुढे म्हणाले, जर निर्बंध हटवणे म्हणजे शरणागती असेल, तर आम्ही ते कधीच करणार नाही; इराणी जनता जीव देईल पण शरण जाणार नाही. याच जोडीला इस्लामाबाद करारानंतर इराणने ओमानशी सागरी सुरक्षेबाबत समन्वय वाढवला. होर्मुझ सामुद्रधुनीतून आंतरराष्ट्रीय सागरी वाहतुकीचा सुरक्षित व अखंड मार्ग सुनिश्चित करण्याची वचनबद्धता दोन्ही देशांनी व्यक्त केली. ही सामुद्रधुनी जागतिक व्यापार व ऊर्जा सुरक्षेसाठी महत्त्वाची असून, ती चीनच्या ऊर्जा सुरक्षेलाही बळकट करते.

या साऱ्या घडामोडींमुळे अमेरिकेच्या एकध्रुवीय वर्चस्वाचे भवितव्य काय, असा प्रश्न स्वाभाविकपणे उपस्थित होतो. इराण-चीन-रशिया यांची नवी धोरणात्मक त्रिकोणी आघाडी अमेरिकन वर्चस्वाच्या अस्ताचे एक प्रबळ लक्षण आहे. सर्वप्रथम, डॉलरचे शस्त्र आता पूर्वीसारखे प्रभावी राहिलेले नाही. अमेरिकेने डॉलरचा वापर आर्थिक शस्त्र म्हणून करत अनेक देशांना वेठीस धरले होते; परंतु चीन-इराण व्यापार युआन-रिआलमध्ये होऊ लागल्याने आणि ब्रिक्समध्ये पर्यायी चलन व्यवस्थेवर चर्चा सुरू झाल्याने डॉलरची पकड सैल होत आहे.इस्लामाबाद करारात अमेरिकेला इराणची गोठवलेली संपत्ती सोडण्याची आणि बंदरांवरील नाकेबंदी संपविण्याची तरतूद मान्य करावी लागली, हा एकप्रकारे माघारीचाच भाग आहे. दुसरीकडे, शांघाय सहकार्य संघटना, ब्रिक्स, बेल्ट अँड रोड या अमेरिकेच्या नाटो आणि जी-७ ला पर्यायी ठरलेल्या बहुध्रुवीय संस्था बळकट होत आहेत. इराण या सर्व संघटनांचा सक्रिय सदस्य बनला असून, ब्रिक्स फ्यूचर नेटवर्क फोरममध्ये त्याने चीनच्या नेतृत्वाखाली डिजिटल पायाभूत सुविधांची आखणी करणे हे अमेरिकन तंत्रज्ञानवर्चस्वाला थेट आव्हान आहे.

लष्करी आघाडीवरही अमेरिकन अजिंक्यतेचा भ्रम भंगला आहे. इराणने ड्रोन व क्षेपणास्त्र हल्ल्यांद्वारे इस्त्राइलची हवाई संरक्षण यंत्रणा भेदली, तेव्हा अमेरिकी शस्त्रांवर उभारलेल्या इस्त्राइलच्या अभेद्यतेचा दरारा कोसळला. पश्चिमेचे तंत्रज्ञान अंतिम नाही, हे चीनच्या सहकार्याने सिद्ध झाले. युद्धविराम करारात अमेरिकेला इस्त्राइलला लेबेनॉनवरील हल्ले थांबविण्यास बांधील करण्याची इराणची अट मान्य करावी लागली, हे अमेरिकन मुत्सद्देगिरीच्या मर्यादा दर्शवते.आर्थिक व तांत्रिक केंद्रसुद्धा आता स्थलांतरित होत आहे. जगातील सर्वांत मोठे उत्पादन केंद्र चीन असून, एआय, विद्युत वाहने, क्वांटम तंत्रज्ञान यांत चीनने आघाडी घेतली आहे. इराणसारखे देश आता भांडवल, तंत्रज्ञान आणि भविष्यातील रोजगार यांसाठी अमेरिकेकडे नव्हे, तर चीनकडे पाहात आहेत. लेखांमधून दिसून आल्याप्रमाणे, इराण स्वतःला चीनच्या मूल्यसाखळीत बसवू पाहात आहे, तर दुसरीकडे ब्रिक्स प्लसच्या माध्यमातून डिजिटल भविष्याची आखणी करत आहे. हे अमेरिकेच्या जागतिक अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असण्याच्या स्थितीला मोठे आव्हान आहे.

यापेक्षाही महत्त्वाची बाब म्हणजे जागतिक दक्षिण गोलार्धाचा वाढता आवाज. चीनने स्पष्टपणे मांडले आहे की संयुक्त राष्ट्रांमध्ये उदयोन्मुख बाजारपेठांचे प्रतिनिधित्व अपुरे आहे आणि जागतिक दक्षिण गोलार्धाचा आवाज अधिक ऐकला जायला हवा. चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांनी जागतिक प्रशासन अधिक न्याय्य व समतोल बनविण्यासाठी श्वेतपत्रिका जारी करताना सांगितले की, लहान असो वा मोठा, सर्व देश आंतरराष्ट्रीय समुदायाचे समान सदस्य आहेत. इराण-चीन भागीदारी ही या बदलत्या जागतिक व्यवस्थेचा एक मूर्त आधारस्तंभ आहे.अमेरिकेच्या एकध्रुवीय कारभाराला नाकारून बहुध्रुवीय, नियमाधारित पण पश्चिमेच्या मक्तेदारीविरहित जागतिक व्यवस्थेचा पाया रचला जात आहे. अर्थात, अमेरिकन वर्चस्व एका रात्रीत पूर्णपणे इतिहासजमा होईल, असे नाही. अमेरिकेकडे अजूनही प्रचंड लष्करी तळ, तांत्रिक क्षमता आणि डॉलरचे राखीव चलन म्हणून स्थान आहे. परंतु एकध्रुवीय जगाचा काळ निश्चितपणे संपत असून, अनेक ध्रुव असलेली एक नवी व्यवस्था उदयास येत आहे, हे या घडामोडी सिद्ध करतात. स्वतः अमेरिकेलाही आता पाकिस्तानच्या मध्यस्थीने करार करावा लागतो आणि युद्धबंदीनंतर ६० दिवसांत सर्वंकष अंतिम तोडगा काढण्याची वचनबद्धता द्यावी लागते, ही वस्तुस्थिती अमेरिकन वर्चस्वाच्या सापेक्ष घसरणीची स्पष्ट निदर्शक आहे.

अखेरीस, इराणला अमेरिका-इस्त्राइलविरुद्ध युद्धात मिळालेली वरचढ आणि त्यानंतर इस्लामाबाद कराराद्वारे साधलेला राजनैतिक फायदा हा चीनच्या खंबीर व बहुआयामी पाठिंब्याशिवाय शक्य नव्हता. चीनने आर्थिक जीवनरेखा, राजनैतिक संरक्षण, तांत्रिक सहकार्य, युद्धोत्तर पुनर्बांधणीची हमी आणि ब्रिक्ससारख्या व्यासपीठांवर सामायिक डिजिटल भविष्याची आखणी करून इराणला एक सर्वांगीण धोरणात्मक भागीदार बनवले आहे. कालिबाफ यांच्या शब्दांत सांगायचे तर, चीन आणि इराण हे कोणत्याही भावी प्रादेशिक गटाचे निश्चित व अपरिहार्य सदस्य बनले आहेत. अमेरिकेचे वर्चस्व जरी अद्याप पूर्णपणे इतिहासजमा झाले नसले, तरी इराण-चीन-रशिया यांची ही नवीन धोरणात्मक आघाडी, जागतिक दक्षिण गोलार्धाचा वाढता आवाज आणि बहुध्रुवीय संस्थांचे बळकटीकरण हे त्या वर्चस्वाचा पाया खणून काढत आहेत, हे निर्विवाद आहे.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नो./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २५/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार शेख मुनिरि शेख रफीक रा.कोटबाजार ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्या शेख मुनिर शेख रफीक रा.कोटबाजार ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नाव शेख मुनिर शेख रफीक रा.कोटबाजार ता.कंधार या ठिकाणी दिनांक १९/०७/१९९५ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २३/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रकटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नो./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २५/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार संतोष साहेबराव कदम रा चिखली ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा मुलगा सौरभ संतोष कदम रा चिखली ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेंल्याचे नाव सौरभ संतोष कदम रा.चिखली ता.कंधार या ठिकाणी दिनांक १०/०३/२०१३ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २३/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रकटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# “थोडीशीही नैतिकता शिल्लक असेल तर खासदारकीचा राजीनामा द्या;पुन्हा जनतेच्या न्यायालयात या”



## ज्योतिबा खराटे यांचे आष्टीकरांना आव्हान

किनवट/प्रतिनिधी- खा.आष्टीकरांनी स्वार्थासाठी लाचारी पत्करून उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेनेतून बाहेर पडले. थोडीशीही नैतिकता शिल्लक असेल तर खासदारकीचा राजीनामा देऊन पुन्हा मैदानात उतरण्याचे आव्हान दिले. किनवट विधानसभा मतदारसंघात 'ऑपरेशन टायगर' राबविण्याच्या वावड्या उठवल्या जात आहेत परंतु सच्चा शिवसैनिक आहारी पडणार नाही. लोकसभा निवडणुकीत ज्या प्रदीप नाईकांनी तुमच्या विजयासाठी जीवाचेरान केले होते, बदल्यात विधानसभा निवडणुकीत नाईकांच्या पराभवासाठी भाजपाचे तळवे चाटून नाईकांच्या पाठीत खंजीर खुपसल्याचा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांनी घणाघाती प्रहार केला.

'ऑपरेशन टायगर' च्या अफवा पसरवली जात आहे. सच्चा शिवसैनिक तशांना भीक घालणार नाही. उबाठा शिवसेनेची भूमिका समोर आलेली नव्हती म्हणून २४ जून रोजी किनवटच्या नगराध्यक्षा सौ.सुजाता एंड्रलवार यांच्या जनसंपर्क कार्यालयात महत्त्वपूर्ण पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. दरम्यान एका पत्रकाराने खोटे आणि बिनबुडाचे वृत्त पसरवल्याच्या पार्श्वभूमीवर खरपूस समाचार घेतला.पक्षप्रमुखांनी लोकसभा निवडणुकीत आष्टीकरांना लोकसभेची आणि मुलाला परवा विधानपरिषदेची उमेदवारी दिल्यानंतरही त्यांनी पक्ष, पक्षप्रमुख, शिवसैनिक आणि मतदारांचा कुटुंबांच्या स्वार्थासाठी आष्टीकरांनी विश्वासघात केल्याची सडकून टीका केली. तुमचे अस्तित्व नसतांनाही तमाम शिवसैनिकांनी आणि स्व.प्रदीप नाईकांनी लोकसभा निवडणुकीत जीवाची बाजी लावत तुम्हाला खासदार बनायचंय. विधानसभेच्या निवडणुकीत तुम्ही उत्तराई होऊन प्रदीप नाईकांच्या पाठीशी राहून महाविकास आघाडीधर्म पाहण्यापेक्षा कृतघ्न होऊन भाजपाकडे मॅनेज होऊन नाईकांच्या पाठीत पराभवाचा आणि विश्वासघाताचा खंजीर खुपसला. विकासाचा तब्बल १५ कोटी रुपयांचा निधी केवळ 'कमिशन'साठी प्रलंबित ठेवण्यात आला. स्व.बाळासाहेबांच्या नावावर खासदारकी मिळवून गद्दारी केलातना, हिंमत असेल तर द्या राजीनामा आणि पुन्हा जनतेच्या कोर्टात जाऊन निवडणूक लढवून दाखवा तेव्हा जनता जनार्दन तुमचे काय हाल करतील ते पहायला मिळणार असल्याचेही खराटे म्हणाले. आम्ही याला मारू, त्याला मारू, याची बघून घेऊ, त्याची बघून घेऊ, अशा पोकळ धमक्यांना निष्ठावंत शिवसैनिक अजिबात भिक घालत नाही. गद्दारांनी पोलिसांची सुरक्षा बाजूला ठेवून जनतेसमोर या. आम्ही सध्या जखमी शेर आहोत आणि जखमी शेर काय करू शकतो, हे येणारा काळच ठरवेल असा सज्जड दमही ज्योतिबा खराटे यांनी दिला. पत्रकार परिषदेदरम्यान किनवट तालुकाप्रमुख मारोती दिवसे, शहरप्रमुख तथा नगरसेवक प्रशांत कोरडे, नगरपरिषदेचे बांधकाम सभापती श्रीराम नेम्मानिवार, माजी शहरप्रमुख संतोष येलचलवार, युवासेनेचे तालुकाप्रमुख अतुल दर्शनवाड,आरिफ भाटी, दत्ता कोल्हे, प्रमोद जाधव, किशोर बोलेनवार, शिवम देवकते, चंद्रमनी कसबे, किरण नगारे, संतोष तक्कलवार यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.



आ.अमरनाथ राजूरकर यांनी सहकुटुंब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथील वर्षा या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी मृणाल अमरनाथ राजूरकर, डॉ.आशुतोष राजूरकर, मृण्मयीताई राजूरकर उपस्थित होते.

# राज्य सरकारने प्रस्तावित गुरुद्वारा बोर्ड कायदा तात्काळ रद्द करावा

## स.मनबीरसिंघ ग्रंथी यांची मागणी



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड येथील जगप्रसिद्ध 'दि नांदेड शीख गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहीब' या तब्बल ७० वर्षांपूर्वी म्हणजेच १९५६ मध्ये करण्यात आलेला जुना कायदा रद्द करून, त्याऐवजी संपूर्ण नवीन कायदा लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सदरील कायदा तात्काळ रद्द करावा अशी मागणी बाबा फतेहसिंघजी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स. मनबीरसिंघ ग्रंथी यांनी केली आहे.

राज्य सरकारने २१ जून २०२६ रोजी भाटीया समितीच्या शिफारशींनुसार राज्य मंत्रिमंडळात दि नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजूर अबचलनगर साहीब अधिनियम, १९५६' हा जुना कायदा रद्द करून तयाऐवजी तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहीब गुरुद्वारा अधिनियम' या नव्या कायद्याच्या प्रारूपाला विधीमंडळाच्या अधिवेशनात ठेवून मंजुरी देण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला. या निर्णयास तख्त सचखंड श्री हजूर साहिबच्या पंजप्यारे साहिबान यांनी सुद्धा हा प्रस्तावित नवीन कायदा आणण्याच्या निर्णयाला एकमताने तीव्र विरोध दर्शवला आहे यानंतर तख्त सचखंड श्री हजूर साहिबचे धुपिया बाबा रामसिंघजी यांनी जत्थेदार संत बाबा कुलवंतसिंघजी आणि समूह पंजप्यारे साहिबान यांच्या उपस्थितीत व्हिडिओ संदेशाद्वारे हुकूमनामा जारी केला करण्यात आला. या हुकूमनाम्यात स्पष्टपणे नमूद केले आहे की पंजप्यारे साहिबान आणि हजुरी साध संगत १९५६ चा कायदा रद्द करण्याच्या निर्णयाला तीव्र विरोध करत आहेत. हुकूमनाम्यात असेही म्हटले आहे की, हे प्रकरण शीख समाजाच्या धार्मिक हक्कांशी आणि प्रशासकीय व्यवस्थेशी संबंधित आहे आणि शीख धार्मिक बाबींमध्ये कोणताही बाह्य हस्तक्षेप स्थानिक सिख समाज कदाचित खपून घेणार नाही असा इशारा ही महाराष्ट्र शासनास देण्यात आला वारंवार धार्मिक स्थळांच्या कारभारात राजकीय हस्तक्षेप करण्याचा सरकारचा - हा प्रयत्न नांदेडच्या स्थानिक शीख समाजाच्या जिव्हारी लागणारा असून, या मनमानी कारभाराला शीख समाज नक्कीच जशास तसे उत्तर देईल, असा इशाराही मनबीर सिंघ ग्रंथी यांनी दिला.


**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नो./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २५/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार शेख रिजवान शेख रफीक रा.कोटबाजार ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्या शेख रिजवान शेख रफीक रा.कोटबाजार ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेंल्याचे नाव शेख रिजवान शेख रफीक रा.कोटबाजार ता.कंधार या ठिकाणी दिनांक १५/११/२००५ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २३/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार



**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नो./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २५/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार संदेश शेषेराव कांबळे रा.कोटबाजार ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा मुलगा संदेश शेषेराव कांबळे रा कोटबाजार ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नाव संदेश शेषेराव कांबळे रा.कोटबाजार ता.कंधार या ठिकाणी दिनांक २२/०६/२००० या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २४/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रकटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार


# नारायणनगरमध्ये घरफोडी

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील नारायणनगर येथे एका घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी १ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

श्रीमती शिवलक्ष्मी राजेश सौडल्लु (वय ३६) रा. नारायणनगर, नांदेड ह्या घराला कुलूप लावून बाहेरगावी गेल्या असतांना अज्ञात चोरट्यांनी घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश केला. कपाटाचे लॉकर फोडून त्यामधील १ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.


**सनद हरवली आहे**

माझी शेख मिया पि.शेख काहु या नावाची १० वी पासची सनद लिंबगाव ते नांदेड प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

पत्ता - **शेख मिया पि.शेख काहु**
रा.पाकिजानगर,नांदेड.
मो.नं.९०२८११७१४४



**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नो./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २५/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार संदीप साहेबराव कदम रा.चिखली ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा मुलगा साहेबराव संदीप कदम रा.चिखली ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेंल्याचे नाव साहेबराव संदीप कदम रा.चिखली ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०१/०९/२०१२ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २३/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रकटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार



**जाहीर प्रगटन**

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज ८०५/२०२६
रजनी व ईतर वि. निरंक
ने. ता. २८/०७/२०२६

अर्जदारः- १. रजनी भ्र. रमाकांत जोशी, वय ७० वर्षे, व्यवसाय-घरकाम, २. राहुल पि.रमाकांत जोशी वय ४१ वर्षे, धंदा व्यवसाय-घरकाम दोघे रा. रेणुका निवास, काबरानगर, नांदेड ता. जि. नांदेड, ३. रूपाली भ्र. गजानन पाठक, वय ४५ वर्षे, व्यवसाय-घरकाम रा. पाठक गल्ली, गंगाखेड ता. गंगाखेड जि. परभणी, ४. रश्मी भ्र. प्रसन्नराव जोशी, वय ३६ वर्षे, व्यवसाय घरकाम रा. कारेगाव रोड, मंगलमुर्ती नगर, परभणी ता. जि. परभणी, ५. श्रध्दा भ्र. संदिप कावडे, वय ३४ वर्षे, व्यवसाय-घरकाम रा.दत्तमंदीरजवळ, शिवाजीनगर, हिंगोली ता.जि.हिंगोली

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत रमाकांत पि. नारायण जोशी यांचा मृत्यु दिनांक २३/०४/२०२४ रोजी काबरानगर, नांदेड ता.जि.नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ हा मुलगा व अर्जदार क्र. ३ ते ५ हया मयताच्या मुली आहेत. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्रमांक १ ते ५ हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक २८/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जबाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २४/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/- आदेशावरुन
क. लिपिक स्वाक्षरित/-
सह दिवाणी न्यायालय, सहा.अधिक्षक
क.स्तर,नांदेड दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड



**जाहीर प्रगटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२११/२०२६
(CNR No.MHND100007652026)

अर्जदार :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सुधीर पि.अंबादासराव तपासे नगरेश्वर कंधार ता.कंधार जि.नांदेड | वय-६० वर्षे | धंदा-पेन्शनर |
| २ | सौ.ज्योती भ्र.किशन झिपरे रा.अक्कलकोट ता.जि.सोलापूर | वय-५७ वर्षे | धंदा-घरकाम |
| ३ | सौ.सविता भ्र.विरु लंगोटे महेबुबनगर ता.जि.मेहेबुबनगर | वय-५५ वर्षे | धंदा-घरकाम |
| ४ | किरण पि.अंबादासराव तपासे कंधार ता.कंधार जि.नांदेड | वय-५२ वर्षे | धंदा-शेती |
| ५ | शितल पि.अंबादासराव तपासे कंधार ता.कंधार जि.नांदेड | वय-४८ वर्षे | धंदा-शेती |

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ते ५ यांची आई नामे हिराबाई अंबादासराव तपासे ही होती ती दिनांक ०९/०५/२०२६ रोजी कंधार ता.कंधार येथे मयत झाली आहे. तसेच अर्जदार क्र.१ ते ५ यांचे वडिल नामे अंबादासराव सिद्रामअप्पा तपासे हे होते ते दिनांक ०३/१०/२००० रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की हिराबाई अंबादासराव तपासे यांचे अर्जदारा शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत हिराबाई अंबादासराव तपासे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत हिराबाई अंबादासराव तपासे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख - २९/०७/२०२६

आज रोजी दि.२३/०६/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/- आदेशावरुन
**कनिष्ठ लिपीक** स्वाक्षरित/-
सह दिवाणी न्यायालय **सहायक अधिक्षक**
क.स्तर,कंधार दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार



**जाहीर प्रगटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१९४/२०२६
(CNR No.MHND100007282026)

अर्जदार :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | त्रीवनबाई भ्र.व्यंकटराव जायभाये | वय-७३ वर्षे | धंदा-शेती |
| २ | बालाजी पि.व्यंकटी जायभाये | वय-३५ वर्षे | धंदा-शेती |
| ३ | कूसूम भ्र.रमेश केंद्रे | वय-४९ वर्षे | धंदा-घरकाम |
| ४ | लक्ष्मीबाई भ्र.भगवान मुंडे | वय-४३ वर्षे | धंदा-घरकाम |

**गैरअर्जदार** - शाखा व्यवस्थापक साहेब दि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.शाखा कूरुळा ता.कंधार जि.नांदेड

प्रकरण : अर्जदार यांना भारतीय वारसा कायदा १९२५ मधील कलम ३७२ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडिल नामे व्यंकटी पांडूरंग जायभाये हे होते. व्यंकटी पांडूरंग जायभाये हे दिनांक २५/०७/२०२५ रोजी मयत झाले आहेत. गैरअर्जदार बँकेमध्ये मयत व्यंकटी पांडूरंग जायभाये यांचे बचत खाते क्र.१०४४१०१११००१६०७ हे होते. सदरील खात्यामध्ये मयताचे नावे १,४३,४२८/- इतकी रक्कम जमा आहे. अर्जदार यांचे म्हणणे आहे की, अर्जदाराशिवाय इतर कोणीही मयताचे वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना गैरअर्जदार यांच्या खात्यातील जमा रक्कम वारसा आधारे अर्जदार यांना उचलणे संबंधी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत व्यंकटी पांडूरंग जायभाये यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख - २१/०७/२०२६

आज रोजी दि.२२/०६/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/- आदेशावरुन
**कनिष्ठ लिपीक** स्वाक्षरित/-
सह दिवाणी न्यायालय **सहायक अधिक्षक**
क.स्तर,कंधार दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

# आदिवासी जमीन व्यवहार प्रकरणी भाजप आ.मेहतांवर ठपका

## चौकशी अहवाल महसूल मंत्र्यांकडे सादर



मुंबई/प्रतिनिधी- आदिवासी जमिनींच्या खरेदी-विक्री व्यवहारात गंभीर अनियमितता झाल्याचा ठपका ठाण्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या चौकशी अहवालातून ठेवण्यात आला आहे. हा अहवाल महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सादर करण्यात आला असून, त्यामध्ये भाजपचे आ. नरेंद्र मेहता आणि त्यांच्या कंपनीच्या नावाचा उल्लेख असल्याने या प्रकरणाने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

मुंबई मिरा भाईंदर परिसरातील मौजे वरसावे येथील विविध गट क्रमांकांवरील जमिनींच्या व्यवहारांची जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्ष-तेखालील समितीने सखोल चौकशी केली. या तपासात आदिवासी जमिनींचे बेकायदा हस्तांतरण, जमीन व्यवहारातील गंभीर अनियमितता आणि महसूल अभिलेखांमधील त्रुटी निदर्शनास आल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. आदिवासी जमीनधारकांच्या मालकीच्या जमिनी बिगर आदिवासी व्यक्ती आणि कँपन्यांकडे नियमबाह्य पद्धतीने हस्तांतरित झाल्याचेही चौकशीत समोर आल्याचे सांगण्यात आले आहे. काशिमीरा परिसरातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगतच्या वरसावे गावातील आदिवासी पाड्यांतील जमीनधारकांनी त्यांच्या जमिनी बेकायदा बळकावल्याची तक्रार केली होती. संबंधित जमिनींवर आमदार नरेंद्र मेहता यांच्या मालकीच्या 'सेव्हन इलेव्हन हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेड' तसेच अन्य संबंधितांनी कब्जा केल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. या कँपनीमध्ये नरेंद्र मेहता यांच्यासह प्रशांत केळुसकर आणि सूर्यकांत सुर्वे हे संचालक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.स्थानिक प्रशासनाकडून न्याय न मिळाल्याने आदिवासी कुटुंबीयांनी थेट महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत महसूल मंत्र्यांनी स्वतंत्र चौकशी समिती नेमून ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार तयार करण्यात आलेला चौकशी अहवाल आता शासनाकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

# आरक्षणाच्या उपवर्गीकरणास ढोर-कक्कया समाजाचा तीव्र विरोध-नामदेव फुलपगार

नांदेड/प्रतिनिधी-अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये प्रस्तावित उपवर्गीकरणाच्या विरोधात राज्यभरात तीव्र असंतोष निर्माण झाला असून, दि. ३० जून रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या भव्य उपवर्गीकरण विरोधी महामोर्चात ढोर-कक्कया समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे जोरदार आवाहन राष्ट्रीय ढोर समाज संघटनेचे प्रदेश महासचिव नामदेव सदाशिवराव फुलपगार यांनी केले आहे.


महाराष्ट्र शासन अनुसूचित जातींच्या आरक्षणात 'अ, ब, क, ड' असे उपवर्गीकरण करण्याच्या हालचाली करत असल्याने समाजात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. अनुसूचित जातींसाठी असलेले १३ टक्के आरक्षण हे सर्व घटकांचे समान हक्काचे असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे वर्गीकरण करण्यात येऊ नये, अशी समाजाची ठाम भूमिका आहे. उपवर्गीकरणामुळे समाजात फूट पडण्याची शक्यता असून सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या दुर्बल घटकांवर अन्याय होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ स्थगित करण्यात यावी, न्यायमूर्ती अनंत बद्दर समितीचा अहवाल सार्वजनिक करण्यात यावा आणि अनुसूचित जातींच्या आरक्षणाशी कोणतीही छेडछाड करू नये, या प्रमुख मागण्यांसाठी हा महामोर्चा आयोजित करण्यात आला आहे. आज आपण शांत बसलो तर उद्या आपल्या मुलांच्या हक्कांवर गदा येऊ शकते. आरक्षण हा केवळ लाभ नसून सामाजिक न्यायाचा घटनात्मक अधिकार आहे. त्यामुळे समाजाच्या अस्तित्वाचा आणि भावी पिढ्यांच्या भविष्याचा प्रश्न लक्षात घेऊन प्रत्येक ढोर-कक्कया समाज बांधवाने मुंबईतील महामोर्चात सहभागी व्हावे, असे भावनिक आवाहन नामदेव फुलपगार यांनी केले.

# माजी सरपंच अशोक बुटले यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

अर्धापूर/प्रतिनिधी- तालुक्यातील लोणी (बु.) चे माजी सरपंच तथा भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते अशोकराव बुटले यांनी भाजपला सोडचिठ्ठी देऊन दि.२३ जून रोजी आपल्या शेकडो समर्थकासह काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

त्यांच्या या काँग्रेस पक्ष प्रवेशामुळे काँग्रेसला अर्धापूर तालुक्यात बळकटी मिळेल असे राजकीय वर्तुळातून बोलल्या जात आहे. लोणी (बु.) चे माजी सरपंच अशोकराव बुटले हे पुर्वश्रमीचे काँग्रेसचे पदाधिकारी होते. परंतु मध्यंतरी त्यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देवून पाच-सहा वर्षापुर्वी भाजपचे देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बारड येथे भाजपात प्रवेश केला होता. परंतू अशोक बुटले फार काळ भाजपात रमले नाहीत. या पक्ष प्रवेश कार्यक्रमात अशोक बुटले त्यांच्य समवेत पृथ्वीराज लोणे, दत्तराव भुस्से यांच्यासह अनेक समर्थकांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. यावेळी भोकर विधानसभेचे नेते तिरुपती कोंढेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रल्हाद सोळंके, डॉ.उत्तमराव इंगळे, चेअरमन दिगंबर पाटील पवार, बळीराम हाट्टेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# शासनाच्या स्वच्छता मोहिमेला देगलूर तहसीलमध्ये हरताळ; शौचालय दरवाजाविनाच



देगलूर/प्रतिनिधी-शासनाच्या विविध योजनांमधून स्वच्छता, आरोग्य व सार्वजनिक सुविधांवर कोट्यवधी रुपये खर्च केले जात असताना देगलूर तहसील कार्यालयातील स्वच्छतागृहाची अवस्था मात्र प्रशासनाच्या दुर्लक्षाचे जिवंत उदाहरण ठरत आहे. कार्यालयातील पुरुषांसाठी उपलब्ध असलेल्या स्वच्छतागृहात मुतारी व शौचालयाची व्यवस्था करण्यात आली असली तरी शौचालयाला दरवाजाच नसल्याचे वास्तव समोर आले आहे.

दरवाजा नसल्याने संबंधित स्वच्छालयाचा वापर करताना कर्मचारी तसेच कामानिमित्त तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. गोपनीयता व मूलभूत सुविधा यांचा पूर्णपणे अभाव असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.विशेष म्हणजे तहसील कार्यालय परिसराच्या सुशोभीकरणासाठी विविध ठिकाणी आकर्षक कुंड्या व सजावटीची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र दुसरीकडे सर्वाधिक आवश्यक असलेल्या स्वच्छतागृहाची दुरवस्था कायम असल्याने प्रशासनाच्या प्राधान्यक्रमावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.सध्या स्वच्छतागृहाच्या मुख्य प्रवेशद्वाराला एकच दरवाजा असून मुतारी आणि शौचालयाचा वापर एकाच वेळी करणे शक्य होत नाही. त्यामुळे कार्यालयीन कर्मचारी व सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. एकिकडे स्वच्छ भारताचे स्वप्न पाहायचे आणि दुसरीकडे मात्र स्वच्छतागृहा सारख्या अत्यावश्यक सुविधेकडे दुर्लक्ष का? असा सवाल उपस्थित होत आहे. स्वच्छ भारत अभियानाचा प्रचार करणाऱ्या शासकीय कार्यालयातच मूलभूत स्वच्छता सुविधांचा अभाव असल्याने प्रशासनाने याची तात्काळ दखल घेऊन स्वच्छतागृहाला दरवाजा बसवून आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# उमरखेड येथे माहेश्वरी समाजाचा महेश नवमी उत्सव साजरा

उमरखेड़/प्रतिनिधी-महेश नवमी निमित्त १३ जून ते २३ जून असा सलग ११ दिवसीय विविध सामाजिक कार्यक्रम राबवित उमरखेड शहरातील स्व. शेठ गो. सो. सारडा राजस्थानी भवन मध्ये महेशोत्सव साजरा करण्यात आला.

यामध्ये समाजातील विविध महिला, पुरुष आणि बालकांनी सहभाग घेऊन अतिशय उत्साहात सर्व उपक्रम राबविले.२३ जून रोजी महेश नवमीच्या दिवशी सकाळी ७ वाजता शहरातील शिवाजी वार्डातील बसवेश्वर संस्थानच्या महादेव मंदिरात पूजन व अभिषेक करून महेश नवमीची सुरूवात करण्यात आली. त्यानंतर शासकीय रुग्णालयात फळे वाटून सामाजिक बांधिलकी जोपासण्यात आली. दुपारी ४ वाजता भव्य शोभायात्रेनंतर सायंकाळी मुख्य समारंभात यवतमाळ जिल्हा माहेश्वरी संगठन अध्यक्ष विजयानंद भुतडा, यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात विविध सामाजिक विषयावर प्रेरक विचार मांडण्यात आले तसेच विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी मुख्य अतिथी म्हणुन यवतमाळ येथील सुप्रसिद्ध वक्ता कमलजी बागडी होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन संदीप भट्टड यांनी केले तर आभार प्रदर्शन ॲड. गोपाल भराडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विनोद तेला, गोकुळ सारडा, राजकुमार भंडारी, आनंद तेला, गोविंद सोमाणी, दिलीप सारडा, कमल भट्टड, मनोज माहेश्वरी, कैलास भंडारी अनुप काबरा, आशिष बंग, प्रमोद बजाज आयुष बाहेती, शुभम बंग, लता मांहेश्वरी, कीर्ती भट्टड व संपूर्ण युवा आणि महिला कार्यकारिणीचा मोठा सहभाग मिळाला.

# अज्ञात चोरट्यांनी भरदिवसा दुचाकी पळविली

नांदेड/प्रतिनिधी- शहरातील छत्रपती चौकातील ज्ञानेश्वरनगर येथे एका घरासमोर लावलेली फॅशन प्रो दुचाकी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना शनिवार दि.२० रोजी दुपारच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ओंकार गंगाधर तेलंगे हे शहरातील छत्रपती चौकातील ज्ञानेश्वरनगर येथे कामानिमित्त भाड्याने राहतात. शनिवार दि.२० रोजी दुपारी १ च्या सुमारास आपल्या फॅशन प्रो दुचाकी क्र.एमएच-२६ बीएफ-८४५९ वरुन घरी जेवनासाठी आले होते. यावेळी त्यांनी दररोज प्रमाणे आपली दुचाकी घरासमोर लावली होती. साधारण दोन अडीचच्या सुमारास जेवन झाल्यानंतर ते पुन्हा कामासाठी जाण्यास घराबाहेर आले. यावेळी त्यांना घरासमोर लावलेली फॅशन प्रो दुचाकी क्र.एमएच-२६ बीएफ-८४५९ ही मिळून आली नाही. त्यामुळे त्यांनी सर्वत्र शोधाशोध करुनही गाडी सापडत नसल्याने ओंकार तेलंगे यांनी भाग्यनगर पोलीस स्टेशन गाठून रितसर फिर्याद दिली असून याप्रकरणी पोलीसांनी अज्ञात दुचाकी चोरा विरोधात गुन्हा दाखल केला आहे.



मृग नक्षत्रात पावसाने दडी मारल्यानंतर गेल्या दोन दिवसांपासून नांदेड जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली आहे. पहिल्यांदाच झालेल्या चांगल्या पावसामुळे नांदेड शहरातील रस्त्यांवर पाणी साचले होते. (छाया : करणसिंह बैस)

## जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज ८६३/२०२६
लक्ष्मीबाई व ईतर वि. निरंक
ने. ता. २९/०७/२०२६

अर्जदारः- १. लक्ष्मीबाई भ्र.सुधाकरराव पुजारी वय ८३ वर्षे, धंदा घरकाम, २. मधुकर पि.सुधाकर पुजारी वय ६२ वर्षे, धंदा - ॲटो चालक, ३. नागेश पि.सुधाकर पुजारी वय ५० वर्षे, धंदा- मजूरी वरील सर्व रा.एन.डी. ४१ बी, ५/८, संभाजी चौक, सिडको, नांदेड, ४. सुनिता भ्र.गुलाबराव बिराजदार वय ६० वर्षे, धंदा - घरकाम रा.संत गोरोबा सोसायटी, लातूर जि.लातूर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावाः बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत सुधाकर पि. नरसिंग पुजारी यांचा मृत्यु दिनांक ०४/०५/१९९८ रोजी सिडको, नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ हा मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मुले व अर्जदार क्र. ४ ही मयताची मुलगी आहे. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्रमांक १ व ४ हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक २९/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २२/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपिक
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
समक्ष श्री.डी.एस.निंबाळकर साहेब ३ रे सह.दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.८६४/२०२६

१) विमलबाई विनायक दहिवाल, वय ७९ धंदा- घरकाम, २) शरद विनायक दहिवाल, वय - ५९, धंदा- सेवानिवृत्त, ३) संदिप विनायक दहिवाल, वय - ४७ धंदा- मजुरी, ४) रितेश विनायक दहिवाल, वय - ४४, धंदा- मजुरी, ५) रविकांत विनायक दहिवाल, वय - ३८, धंदा- नौकरी, सर्व रा.घर क्र.एन. डी.४१ बी ७/३, संभाजी चौक, सिडको, नांदेड. ०६) ज्योति संजय उडानशीव, वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम, रा. अदिलाबाद, ता. जि. अदिलाबाद राज्य तेलंगना, ०७) सविता संदिप शहाणे, वय ४० वर्षे, धंदा - घरकाम, रा. नरेगांव, पुणे.

विरूध्द
निरंक

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार मयत विनायक विश्वनाथ दहिवाल यांचे वारस आहेत. मयत विनायक विश्वनाथ दहिवाल यांचा मृत्यू दिनांक १९/०४/२०२१ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वत:ता न्यायालयात दिनांक २९/०७/२०२६ रोजी किंवा एक महिन्यामध्ये नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २४/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपिक
३ रे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
स.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

## CHANGE IN NAME/SURNAME

My (old name) is **SHAIKH NAYUM AHAMADSAB** which now I am, changing as (new name) **NAYUM AHAMADSAB SHAIKH**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**NAYUM AHAMADSAB SHAIKH**
R/o Betmogra, Tq.Mukhed Nanded-431715
M.No.-8007740575

## तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com — जा.क्रं.२०२६/ज.मृ.नो./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ — दिनांक - २८/०४/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार श्री.मारोती पि.नामदेव वाघमारे रा.तेलुर ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.नामदेव पि.मरीबा वाघमारे रा.तेलुर ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव/ नामदेव पि.मरीबा वाघमारे रा.तेलुर ता.कंधार जि.नांदेड या ठिकाणी दिनांक ०६/०३/२००० या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २०/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- २८/०४/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

पान १ वरुन

## विद्यापीठ पेपरफुटी प्रकरणाची...

सुरक्षाव्यवस्थेचे पुनर्मूल्यांकन करून डिजिटल प्रणालीतील त्रुटी दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील.दरम्यान, चर्चेदरम्यान शिवसेना (ठाकरे गट)चे आमदार अनिल परब यांनी या प्रकरणात 'सलगर' नावाच्या व्यक्तीचा उल्लेख करत गंभीर आरोप केले. संबंधित व्यक्ती अद्याप अटकेबाहेर असून तो स्वतःला मंत्री चंद्रकांत पाटील यांचा निकटवर्तीय असल्याचे सांगत असल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करून संबंधित व्यक्तीला आरोपी करण्यात यावे, अशी मागणी परब यांनी केली.मात्र, मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अनिल परब यांनी केलेले सर्व आरोप स्पष्टपणे फेटाळून लावत, कोणालाही पाठीशी घातले जाणार नसून चौकशी कायद्यानुसारच होईल, असे सभागृहात स्पष्ट केले.

## पाच जणांच्या हत्येच्या...

त्यामागे नेमके काय कारण होते, याचा सखोल तपास करावा, अशी मागणी केली आहे. जर संबंधित विधान खरे असेल, तर त्याआधारे गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, असेही त्यांनी नमूद केले आहे. घरात घुसून बॉम्ब टाकेन या कथित धमकीचाही उल्लेख करत राऊत यांनी हा केवळ राजकीय वादाचा विषय नसून राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित गंभीर मुद्दा असल्याचे म्हटले आहे. या विधानामागील वस्तुस्थिती तपासण्यासाठी दहशतवादविरोधी पथकाची (एटीएस) मदत घेऊन चौकशी करावी, आवश्यक असल्यास झडती घ्यावी आणि बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायदा (यूएपीए) अंतर्गत कारवाईचा विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.मुंबई पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष आणि तातडीने चौकशी करावी, अन्यथा न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्याचा इशाराही राऊत यांनी दिला आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४